माहितीचा अधिकार

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२४/अपील/०३/२०२४/0964 दिनांक:०६.०३.२०२४

| | | |
|---|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | १८.१२.२०२३ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | : | २६.१२.२०२३ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : | २०.०२.२०२४ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | : | ०६.०३.२०२४ |

**सक्षम प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत)**

**अपील क्र. ०३/२०२४**

श्री. चंद्रकांत बाळकृष्ण परब **... अपीलकर्ता**

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई **... प्रतिवादि**

**आपीलाचे तथ्य:-**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२०२३ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक १८.१२.२०२३ रोजी प्राप्त झाला. आपीलार्थी यांच्या दिनांक १५.१२.२०२३ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६.१२.२०२३ रोजी चे पत्रांन्वये समाधानकारक माहिती न पुरवल्यामुळे आपीलार्थी यांनी दिनांक --.०२.२०२४ रोजी त्याच माहितीसाठी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केले. (अर्ज प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक २०.०२.२०२४ रोजी प्राप्त झाला).

प्रथम आपीलीय अधिकारी यांनी आपीलार्थी यांना दिनांक २१.०२.२०२४ रोजी नोटिस पाठवून दिनांक २९.०२.२०२४ रोजी दोन्ही अर्जा वर सुनावणी आयोजीत केली होती. परंतु सुनावणीसाठी आपीलार्थी यांनी त्यांच्या जमिनीच्या महत्वाच्या कामासाठी गावी जात असल्या कारणाने सुनावणी साठी दिनांक २९.०२.२०२४ रोजी उपस्थित राहता येत नसल्याने त्यांच्या गैर हजेरीत सुनावणी घेण्यात यावी असे दिनांक २३.०२.२०२४ च्या

पत्राद्वारे कळविले आहे. दिनांक २९.०२.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी हजर झाले व त्यांनी सुनावणी दरम्यान मौखिक निवेदन सादर केले.

**अपीलातील निवेदवारून आपिलातील मुद्दे खालील खालील प्रमाणे आहे:-**

**मागीतलेली माहिती :**

१. बंद असलेला वीज मीटर तसेच घर बंद असताना विजेचा वापर केला जात नसतानाही जास्त आलेले वीज कमी करून मिळण्याबाबत दिनांक २५.०९.२०२३ रोजी सन्माननिय अध्यक्ष ऊर्जा आयोग, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर नं. १, १३ वा मजला, कफ परेड, कुलाबा कार्यालयात पाठवलेल्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती आपल्या सही आणि शिक्यांनी साक्षांकित करून मिळावी.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:**

आपला दि. २५.०९.२०२३ रोजीचा अर्ज पुढील कार्यवाहीकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. प्रकाशगड, मुंबई यांना दिनांक १६.११.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे अग्रेषित केलेला आहे. (सोबत प्रत जोडली आहे).

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण:**

माहिती दिली नाही.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे:**

जन माहिती अधिकारी यांचे पत्र अपीलकर्ता यांना दिनांक २८.१२.२०२३ रोजी प्राप्त झाल्याचे अपीलकर्ता यांनी नमूद केले आहे त्यानुसार अपील करण्याची शेवटची तारीख ही दिनांक २७.०१.२०२४ होती. तरीसुद्धा प्रथम अपील दाखल करून दिनांक २९.०२.२०२४ रोजी सुनावणी असल्याबाबत अपीलकर्ता यांना कळविले आहे.

दिनांक २५.०९.२०२३ रोजीचा अर्ज हा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे. त्यामुळे सदर अर्ज महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांना अग्रेषित करणे अपेक्षित आहे आणि तसे जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे ही वस्तुस्थिती आहे. परंतु, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांच्या कडून सदर अर्जा संबंधित माहिती अप्राप्त आहे असे अपीलकर्ता यांनी कळविले आहे.

त्याअनुषंगाने अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. कडे सदर विषयाबाबत विचारणा करावी तसेच, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी ग्राहकांसाठी त्यांच्या तक्रारी मांडण्यासाठी ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २०२० अंतर्गत उपलब्ध करून दिलेल्या मंचा चा उपयोग करावा.

त्यानुसार अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम आपीलीय अधिकारी यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०००३२ येथे अपील दाखल करू शकता.**

<u>निर्णय</u>

**अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.**

(आभिजीत चाटुफळे)

**उप संचालक** (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय **अधिकारी**

प्रती,

श्री. चंद्रकांत बाळकृष्ण परब
जनसेवा वेल्फेअर सोसायटी,
संत कबीर मार्ग, कोकणी पाडा,
दहिसर (पूर्व), मुंबई-४०००६८.

(आभिजीत चाटुफळे)

**उप संचालक** (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय **अधिकारी**

प्रत,

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई